**आर.सी.सी.नं. ११८/२०२१**
**निशाणी — ६३**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा शपथेवर जबाब.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | **सिध्देश्वर नामदेव भायगुडे** |
| वय | : | ४६ वर्षे |
| व्यवसाय | : | सेवानिवृत्त |
| राहणार | : | शेंडी, ता.वाशी, जि.उस्मानाबाद |

**सरतपास सरकार तर्फे श्री.एस.आर.सययद, सरकारी वकील यांचे मार्फत :**

मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. मिराबाई प्रकाश शिंदे ही माझे गावातील रहिवाशी आहे. तसेच आरोपी अभिमान हा माझे गावातील रहिवाशी आहे. असे काही घडले नाही की, आरोपी व मिराबाई यांच्यात भांडण झाले व ती मी सोडवले.

*(साक्षीदार सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांचे विनंतीवरून, त्यांना साक्षीदाराची उलट—तपासणी घेण्याची परवानगी देण्यात येते.)*

**सरकार पक्षातर्फे उलट—तपासणी :**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/०६/२०२१ रोजी आरोपीने माझे समक्ष फिर्यादीस शिवीगाळ केली, कु—हाडीने मारहाण केली व फिर्यादीचे डोक्याचे रक्त निघाले. आता मला पोर्शन मार्क अ मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला, सदर मजुराप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझे गावातील रहिवाशी असल्याने त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतफै श्री. जी.एस.सुकाळे विधीज्ञ यांचेमार्फत नाकारला.**

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/—

दिनांक : ०४/०८/२०२६

**(श्रीमती.एम.व्ही.पाटील राठोडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वाशी